# MET Bhujbal Knowledge City

## Institute of Engineering

एम.इ.टी./बी.के.सी./आय.ओ.ई./जा.क्र./ 810 दि.18/11/2025

प्रती,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
सामनगाव रोड, नाशिकरोड,
नाशिक.

विषय : सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी, भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिवस" ह्या उपक्रमाचा अहवाल सादर करणे बाबत.

संदर्भ : जा.क्र.तांशि/विकाना/तांशा/२०२५/२६२४ , दिनांक ४ नोव्हेंबर २०२५

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार प्रत्येक महाविद्यालयात दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिवस", साजरा करण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत तरी वरील सुचनेनुसार आपण शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयास सुट्टी असल्या कारणामुळे, सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ महाविद्यालयात (ग्रंथालयात) भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिवस" ह्या उपक्रमांतर्गत मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट चे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नशिक. या महाविद्यालयामार्फत "जनजाती गौरव दिवस" ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याचा अहवाल आपणास सविनयसादर करीत आहोत.

कळावे,

डॉ. विजयकुमार वाणी
प्राचार्य
Principal
MET's Institute of Engineering,
Bhujbal Knowledge City
At.Adgaon, Tal. & Dist.Nashik-3

आवक/जावक लिपीक
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
नाशिक
19 NOV 2025

MET's Institute of Engineering, ADGAON, NASIK-3, Bhujbal Knowledge City

Adgaon, Nashik - 422 003
Mobile : (91) 09881100099 | Tel. : (0253) 2303515 | Telefax : (0253) 2303203
E-mail : enquiries@bkc.met.edu | www.metbhujbalknowledgecity.ac.in
ISO 9001-2008 certified MET is an NGO in Special Consultative Status with United Nations (ECOSOC)

महाराष्ट्र शासन
# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
चेहेडी (बु),सामनगांव रोड, नाशिक रोड, नाशिक - ४२२ १०१
दुरध्वनी क्रमांक . (०२५३) २४६१४७९
ई मेल ronashik@dtemaharashtra.gov.in सकेतस्थळ - www.dtensk.org

जा.क्र.तंशि/विकाना/तांशा/२०२५/2624 दिनांक:- 4 NOV 2025

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित,
पदविका पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक.

विषय : - भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर हा दिवस "जनजाती गौरव दिन" म्हणून संपूर्ण महाराष्ट्र भर साजरा करण्याबाबत.

संदर्भ:- संचालनालयाचे पत्र क्र.१६/संकीर्ण/जनजाती गौरव दिन/२०२५/२५१, दि.०३.११.२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून, संदर्भिय पत्रान्वये, सन २०२५ हे वर्ष भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष (१५० वर्ष) म्हणून साजरे करण्यात येत आहे,दि. १५ नोंव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त **"जनजाती गौरव दिन"** राज्यभर साजरा करण्यात येणार आहे..

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, दि.१५ नोव्हेबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करून "जनजाती गौरव दिन" साजरा करण्यात यावा तसेच सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सोबत- सहपत्रे

(डॉ.गोरक्ष विठोबा गर्जे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक.

Rajani Folder २०२४ /Govt,private,university ALL institute letter

MET's Institute of Engineering Bhujbal Knowledge City ADGAON, NASIK-3

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६.
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

का.१६/संकीर्ण/जनजाती गौरव दिन/२०२५/ २१५१ दिनांक: 3 NOV 2025

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, म.रा., मुंबई

विषय :- भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर हा दिवस "जनजाती गौरव दिन" म्हणून संपूर्ण महाराष्ट्र भर साजरा करण्याबाबत..

संदर्भ :- उच्च् व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.उशिसं/मवि-१/संकीर्ण/जयंती/परिपत्रक, दि.२८ ऑक्टोबर, २०२५

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र.१ चे शासन पत्र तसेच सदर पत्रासोबत जोडलेले मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र कृपया पहावे.

सन २०२५ हे वर्ष भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष (१५० वर्ष) म्हणून साजरे करण्यात येत आहे. दि. १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिन" राज्यभर साजरा करण्यात येणार आहे.

त्यानुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना संदर्भाधीन शासन पत्र व त्या सोबतचे सहपत्र पाठवून पत्रात नमुद सूचनांप्रमाणे दि.१५ नोव्हेंबर, २०२५ रोजी "जनजाती गौरव दिन" साजरा करण्याबाबतच्या सूचना तात्काळ देण्यात याव्यात. तसेच सदर प्रकरणी संस्थेकडून आयोजित करण्यात आल्या कार्यक्रमांची माहिती विभाग निहाय या संचालनालयास सादर करण्यात यावी..

(डॉ.सुनिल भामरे)
सह संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय म. रा., मुंबई

MET's Institute of Engineering, ADGAON, NASIK-3, Bhujbal Knowledge City

Desktop/MD/Statistic Information letter

४८
३१/१०/२५

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,

४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

Web:www.dhepune.gov.in ०२०/२६१२२११९ : director.dhepune@nic.in

क्र.उशिसं/मवि-१/संकीर्ण/जयंती/परिपत्रक दिनांक २८ ऑक्टोबर २०२५

परिपत्रक

विषय : भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर हा दिवस "जनजाती गौरव दिन" म्हणून संपूर्ण महाराष्ट्र भर साजरा करण्याबाबत.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, सन २०२५ हे वर्ष भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष (१५० वर्ष) म्हणून साजरे करण्यात येत आहे. दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिन" राज्यभर साजरा करण्यात येणार आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये तसेच कार्यक्षेत्रातील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन "जनजाती गौरव दिन" उत्साहात साजरा करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत संचालनालयास अहवाल सादर करावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १६

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
३. प्राचार्य / संचालक, सर्व शासकीय, अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

प्रत : मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत : मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन

JANJATIYA GAURAV VARSH

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
आदिवासी विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक 2 7 OCT 2025

महोदय,

सन २०२५ हे वर्ष भगवान बिरसा मुंडा यांचे १५० व्या जयंती निमित्ताने जनजाती गौरव वर्ष म्हणून देशभर साजरे करण्यात येत आहे.

दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिन" राज्यभर साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने आदिवासी विकास विभागामार्फत नागपूर येथे राज्यस्तरीय मुख्य शासकिय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

तरी, भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचा राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम हा नागपूर येथे दिनांक १५ ते १७ नोव्हेंबर, २०२५ या दिवशी साजरा करण्यात येणार आहे. तरी आपण आपली दिनांक व वेळ या कार्यक्रमासाठी राखून ठेवून कार्यक्रमास आवर्जुन उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.

कार्यक्रमाची रूपरेषा व निमंत्रण पत्रिका स्वतंत्ररित्या विभागामार्फत आपणास कळविण्यात येईल.

(डॉ. अशोक वुईके)

प्रति,

मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य,
मंत्रालय, मुंबई

MET's Institute of Engineering
ADGAON NASIK-3
Bhujbal Knowledge City

मंत्री

महाराष्ट्र राज्य

मंत्री
आदिवासी विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक :

प्रति,
मा.देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य.

विषय : भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर हा दिवस जनजाती गौरव दिन म्हणून संपूर्ण महाराष्ट्र भर साजरा करण्याबाबत.

महोदय,

सविनय विनंती करण्यात येते की, सन २०२५ हे वर्ष भगवान बिरसा मुंडा यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त **"जनजाती गौरव दिन"** राज्यभर साजरा करण्यात येणार आहे. जनजाती गौरव दिन शालेय शिक्षण विभागामार्फत तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत महाराष्ट्रभर उत्साहात साजरा व्हावा ह्यासाठी आपल्या स्तरावरून मा .मंत्री शालेय शिक्षण व मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण ह्यांना आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात शालेय शिक्षण विभाग तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व शाळा, महाविद्यालये ,विद्यापिठे ह्यांनी जनजाती गौरव दिन सर्वत्र व उत्साहात साजरा करण्याबाबत आपल्या आदेशाने सविस्तर सूचना निर्गमित करण्याबाबत कृपया सूचित करावे ही नम्र विनंती

आपला,

(डॉ. अशोक वुईके)

प्रत:-

१)मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.

२)मा. मंत्री शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, माहिती व उचित कार्यवाहीसाठी

## INTERNAL NOTE

Ref. No:- BKC/MET/IOE/Library/2025-26

From:- Dr. Sambhaji Patil (Librarian)

To: - All Heads, MET-BKC-IOE, Nashik

Through: - Principal, MET-BKC-IOE, Nashik

Ref.:- जा.क्र.तांशि/विकाना/तांशा/२०२५/२६२४ , दिनांक ४ नोव्हेंबर २०२५

Sub.: - सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी, भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिवस" साजरा करणे बाबत.......

Date:- ११ नोव्हेंबर २०२५

"नोटीस"

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि, महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी यांना निमंत्रित करण्यात येते कि, मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय यांचेकडून आलेल्या सुचनेनुसार संदर्भ क्रमांक - जा.क्र.तांशि/विकाना/तांशा/२०२५/२६२४ , दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ प्रत्येक महाविद्यालयात दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिवस", साजरा करण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत तरी वरील सुचनेनुसार आपण शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी आपल्या महाविद्यालयास सुट्टी असल्या कारणामुळे आपण सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ आपल्या महाविद्यालयात (ग्रंथालयात) "जनजाती गौरव दिवस", साजरा करत आहोत.

सूचनेनुसार, उच्च शैक्षणिक संस्थांना भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजातिय गौरव दिवस" साजरा करण्याच्या भाग म्हणून काही उपक्रम राबवावे लागतील जे भगवान बिरसा मुंडा आणि जनजातिय समुदायातील इतर प्रतिष्ठित व्यक्तींच्या वारशावर प्रकाश टाकतील. वरील सूचनांनुसार आम्ही शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी आपल्या महाविद्यालयास सुट्टी असल्या कारणामुळे आपण सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात (मध्यवर्ती ग्रंथालय) "जनजातिय गौरव दिवस" साजरा करत आहोत.

यानिमित्त सरकारने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मध्यवर्ती ग्रंथालयात भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजातिय गौरव दिवस" साजरा करत आहोत, त्यानिमित्त विविध भाषांमधील आदिवासी समाजावरील पुस्तकांचे तसेच जनजागृतीवरील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करणार आहोत, त्यानिमित्ताने आपण सर्वांनी ह्या कार्यक्रमास उपस्थित रहावे. सर्व प्रमुख, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यामध्ये आपला सहभाग नोंदवावा, तुमची उपस्थिती हीच कार्यक्रमाची यशस्वीता आणि शोभा आहे.

कार्यक्रम आणि पुस्तक प्रदर्शन स्थळ: सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२५, मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३.
वेळ: सकाळी ११.०० वाजता

डॉ. संभाजी पाटील
ग्रंथपाल

प्रा. योगेश पाटणी
राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी

MET's Institute of Engineering, ADGAON, NASIK-3, Bhujbal Knowledge City

डॉ. विजयकुमार वाणी
प्राचार्य
Principal
MET's Institute of Engineering,
Bhujbal Knowledge City
At.Adgaon, Tal. & Dist.Nashik-3.

प्रत : सर्व विभाग प्रमुख

दिनांक १८ नोव्हेंबर २०२५

अहवाल

"जनजाती गौरव दिवस" – भगवान बिरसा मुंडा जयंती उत्सव

**स्थळ: मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक – ३**

विषय: भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिवस" उपक्रमाच्या आयोजनाचा सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत.

मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय यांचेकडून आलेल्या सुचनेनुसार संदर्भ क्रमांक - जा.क्र.तांशि/विकाना/तांशा/२०२५/२६२४ , दिनांक ४ नोव्हेंबर २०२५, प्रत्येक महाविद्यालयात दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिवस", साजरा करण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत तरी वरील सुचनेनुसार या विशेष उपक्रमाचे आयोजन मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३ येथे शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयास सुट्टी असल्या कारणामुळे सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिवस" हा कार्यक्रम यशस्वीपणे साजरा केला.

हा उपक्रम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिट आणि मध्यवर्ती ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. उपक्रमात महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विविध शाखांतील विद्यार्थी वर्ग यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारीवृंद व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी **"जनजाती गौरव दिवस"** मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारतातील आदिवासी समाजाच्या गौरवशाली इतिहासाची आणि त्यांच्या सामाजिक योगदानाची जाणीव करून देण्यासाठी तसेच **भगवान बिरसा मुंडा** यांच्या कार्याचा प्रसार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या परिपत्रकानुसार हा उपक्रम राबविण्यात आला.

मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या आवाहनानुसार व शासनाच्या आदेश क्रमांक **जा.क्र. तांशि/विकाना/तांशा/२०२५/२६२४**, दिनांक **४ नोव्हेंबर २०२५**, या संदर्भात सर्व उच्च शिक्षण संस्थांना भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त **"जनजाती गौरव दिवस"** साजरा करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने आमच्या महाविद्यालयात या दिवशी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे –

1. आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक वारशाची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.
2. भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याचा गौरवपूर्वक स्मरण करणे.
3. आदिवासी समाजातील महान व्यक्तींच्या योगदानाची माहिती देणे.
4. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक ऐक्य, समरसता आणि राष्ट्रीय अभिमान जागवणे.

MET's Institute of Engineering ADGAON, NASIK-3 Bhujbal Knowledge City

कार्यक्रमाचे आयोजन **डॉ. संभाजी पाटील (ग्रंथपाल)**, **प्रा. योगेश पाटणी (राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी)** आणि **डॉ. विजयकुमार वाणी (प्राचार्य)** यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.


सकाळी ११.०० वाजता मध्यवर्ती ग्रंथालयात कार्यक्रमाची सुरुवात झाली. सर्वप्रथम भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना (NSS) स्वयंसेवकांनी स्वागत गीत सादर केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी **डॉ. विजयकुमार वाणी**, प्राचार्य, उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याचे ऐतिहासिक महत्त्व उलगडून सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक बदलाचे वाहक बनण्याचे आवाहन केले.

**डॉ. संभाजी पाटील**, ग्रंथपाल यांनी ग्रंथालयात आयोजित पुस्तक प्रदर्शनाविषयी माहिती दिली. त्यांनी सांगितले की या प्रदर्शनात विविध भाषांमधील आदिवासी समाज, त्यांच्या इतिहास, लोकसंस्कृती, आणि सामाजिक योगदान यावरील सुमारे ५० हून अधिक पुस्तके मांडण्यात आली होती.

**प्रा. योगेश पाटणी**, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी यांनी विद्यार्थ्यांना समाजात एकात्मतेचा आणि आदरभावाचा संदेश देण्याचे आवाहन केले. त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या आदिवासी स्वातंत्र्य चळवळीतील नेतृत्वाची माहिति विद्यार्थ्यांना दिली.

ग्रंथालयातील **पुस्तक प्रदर्शन** हा कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरला. येथे आदिवासी समाजावरील, त्यांचा इतिहास, लोककला, शिक्षण, आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीत त्यांच्या योगदानाविषयी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांतील पुस्तके ठेवण्यात आली होती. विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी उत्साहाने या प्रदर्शनाला भेट दिली. कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना (NSS), विद्यार्थी परिषद, तसेच विविध विभागातील विद्यार्थ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना समाजातील प्रत्येक घटकाबद्दल आदराची भावना निर्माण झाली. भगवान बिरसा मुंडा यांनी समाजात समानतेसाठी आणि आदिवासी जनतेच्या अधिकारांसाठी दिलेले योगदान विद्यार्थ्यांना प्रेरणादायी वाटले. "जनजाती गौरव दिवस" या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक ऐक्य, भारतीय संस्कृतीचे वैविध्य आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दृढ केला.



"जनजाती गौरव दिवस" हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. सर्व प्राध्यापक, कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. ग्रंथालयातील पुस्तक प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण झाली आणि आदिवासी समाजाच्या वारशाबद्दल नवी माहिती मिळाली. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांनी सर्वांचे आभार मानले व पुढील वर्षी हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात साजरा करण्याचे आवाहन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, इतिहासाबद्दल अभिमान आणि विविधतेतून एकतेचा भाव दृढ झाला. भगवान बिरसा मुंडा यांचे विचार आणि कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या स्मरणातून विद्यार्थ्यांना धैर्य, निष्ठा आणि समाजसेवेचे मूल्य समजले.

महाविद्यालयाने शासनाच्या सूचनांचे पालन करत "जनजाती गौरव दिवस" मोठ्या उत्साहाने व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडला. हा दिवस निश्चितच विद्यार्थ्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीवेच्या विकासासाठी एक महत्वाचा टप्पा ठरला.



या प्रसंगी महाविद्यालयातील विविध विभाग प्रमुख आणि प्राध्यापक वर्ग देखील उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. श्यामकुमार काळपांडे, डॉ. विठ्ठल गोंड, डॉ. शामराव गुमास्ते, डॉ. प्रशांत यावलकर, डॉ. पवन घुमरे, डॉ. दीपक कदम, डॉ. पुंडलिक जाधव, डॉ. विनोद खैरनार आणि डॉ. नमिता काळे यांचा सक्रिय सहभाग होता.

**डॉ. संभाजी पाटील**
ग्रंथपाल

**प्रा. योगेश पाटणी**
राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी

**डॉ. विजयकुमार वाणी**
प्राचार्य

Principal
MET's Institute of Engineering,
Bhujbal Knowledge City
At.Adgaon, Tal. & Dist.Nashik-3.

MET's Institute of Engineering
ADGAON, NASIK-3
Bhujbal Knowledge City